Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN(o): 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 9.134
Volume - 9, Issue - 7, July - 2026

DOIs:10.2018/SS/202607005 --:-- Research Paper / Article / Review

धम्मपदातील निवडक गाथांचे चिकित्सक अध्ययन. नैतिक, तात्त्विक व सामाजिक परिमाणे

सत्यजीत दौलत इंगोले
संशोधक विद्यार्थी गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ संचलित मधुकरराव पवार कला महाविद्यालय मुर्तीजापूर.
Email - **Satyajitingole358@gmail.com**

सारांश : पाली त्रिपिटकातील खुद्दकनिकाय अंतर्गत समाविष्ट असणारे 'धम्मपद' हे थेरवाद बौद्ध परंपरेतील केवळ धार्मिक ग्रंथ नसून, श्रमण परंपरेतील नैतिक, तात्त्विक व सामाजिक विचारसरणीचा मूळ गाभा आहे. धम्मपदा मध्ये ४२३ गाथा व २६ वग्गांमध्ये विभक्त असलेला हा ग्रंथ मानवी विचार, आचरण आणि मुक्तीच्या मार्गांचे विश्लेषण करतो. प्रस्तुत समीक्षा पेपरचा मुख्य उद्देश धम्मपदातील १५ वग्गांतील निवडक प्रतिनिधिक गाथांचे चिकित्सक, विषयनिष्ठ व तार्किक अध्ययन करणे हा आहे. अभ्यासात भावनत्मक दृष्टिकोन पूर्णपणे बाजूला ठेवून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धर्मानंद कोसंबी, राहुल सांकृत्यायन, भदंत आनंद कौसल्यायन, डॉ. वा. रा. काळसेकर व भालचंद्र मुणगेकर या भारतीय विद्वानांच्या चिकित्सक चौकटीचा वापर करण्यात आला आहे. यमकवग्गा पासून ते ब्राह्मणवग्गा पर्यंतच्या २६ वग्गांचे विश्लेषण करून, ग्रंथातील नैतिक स्वायत्तता, चेतना-केंद्रित कर्मवाद, वर्णव्यवस्थे वरची टीका आणि आधुनिक मानसशास्त्र, शांतता अभ्यास व सामाजिक न्यायातील त्याची प्रासंगिकता सिद्ध केली आहे. तसेच, ग्रंथातील वैयक्तिक नीतिशास्त्रावरील अगाउ भर आणि संस्थात्मक अन्यायाबाबतची अप्रत्यक्षता या मर्यादांवरही शास्त्रीय प्रकाश टाकला आहे.

शब्द (Keywords):- धम्मपद, पाली त्रिपिटक, बौद्ध नीतिशास्त्र, चेतनावाद, वर्णव्यवस्था-टीका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समकालीन प्रासंगिकता.

१. प्रस्तावना :

धम्मपद हे केवळ बौद्ध सिद्धांतांचे संकलन नसून प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातील विवेकवादी परंपरेचा दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, "धम्मपद हे बुद्धांच्या धम्माचे हृदय असून ते मानवी आचरणासाठी मार्गदर्शक संहिता प्रदान करते" (बुद्ध आणि त्यांचा धम्म ११२). इ.स.पू. तिसऱ्या शतकापासून भारतीय संस्कृतीत नैतिक शिक्षण आणि आत्मनियंत्रणाचा आधार म्हणून या ग्रंथाकडे पाहिले गेले.

तरिहि, पारंपारिक वाचनामध्ये धम्मपदाचा वापर बऱ्याचदा केवळ श्रद्धेने, पठण मनन करने किंवा वैराग्यवादी उपदेशापुरता मर्यादित केला जातो. अशा वाचनामुळे ग्रंथातील मूळ सामाजिक क्रांतीचा आणि तर्कनिष्ठ मानसशास्त्राचा गाभा झाकला जातो. प्रस्तुत संशोधन पेपर धम्मपदातील १५ वग्गांचे क्रमवार, चिकित्सक आणि सामाजिक-तात्त्विक वाचन प्रस्तुत करतो. मानवी मनाचे सूक्ष्म व्यवहार, अहिंसेचा नैतिक पाया, जन्म आणि जाती वादावर केलेले प्रहार आणि निब्बानाची संकल्पना यांचा अभ्यास आधुनिक आंतरशास्त्रीय चौकटीतून करणे हे या समीक्षा पेपरचे मुख्य सूत्र आहे.

२. संशोधन पद्धती व मूळ स्रोत.

या संशोधन पेपरमध्ये गुणात्मक-पाठ्यविश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

प्राथमिक स्रोत:

मूळ पाली पाठासाठी विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट (VRI, इगतपुरी) आणि पाली टेक्स्ट सोसायटी (PTS, लंडन) यांच्या प्रमाणित आवृत्त्यांचा वापर केला आहे.

द्वितीयक स्रोत व अनुवाद.
डॉ. बी. आर. आंबेडकर, भदंत आनंद कौसल्यायन, धर्मानंद कोसंबी, डॉ. वा. रा. काळसेकर, डॉ. श्री. य. कुलकर्णी आणि भालचंद्र मुणगेकर या भारतीय विद्वानांच्या समीक्षात्मक ग्रंथांचा आधार घेण्यात आला आहे.

३. वग्गनिहाय चिकित्सक विश्लेषण

३.१. यमकवग्ग

मूळपाली गाथा;- (१)

"मनोपुब्बंगमा धम्मा, मनोसेट्ठा मनोमया।
मनसा चे पदुट्ठेन, भासति वा करोति वा।
ततो नं दुक्खमन्वेति, चकं व वहतो पदं"॥

मराठी अर्थ;- सर्व प्रकारचे धम्म प्रथम मनामध्ये उत्पन्न होतात, ते मनोमय आहेत, मन श्रेष्ठ आहे. जर कोणी दूषित मनाने बोलतो किंवा कोंणतेहि कार्य करतो, तर दुःख त्याच्या मागे तसेच लागते जसे गाडीचे चाक बैलाच्या पायामागे धावते.

चिकित्सक विश्लेषण;- ही गाथा बुद्ध तत्वज्ञानाचा आणि वैज्ञानिक पाया मांडते. कर्म हे केवळ भौतिक शारीरिक हालचाल नसून ती एक 'चेतना' आहे. वैदिक परंपरेतील बाह्य कर्मकांड आणि शुद्धीकरणाला फाटा देऊन तथगत भगवान बुद्धांनी नैतिकतेचे केंद्र मानवी चेतनेमध्ये स्थापित केले. आधुनिक संज्ञानात्मक मनोविज्ञानातील CBT (Cognition Behavioral Therapy) सिद्धांताशी हे तंतोतंत जुळते. परंतु, संरचनात्मक हिंसा (Structural Violence) ही केवळ व्यक्तीच्या वाईट मनोवृत्तीतूनच नव्हे, तर शोषणकारी सामाजिक-आर्थिक संस्थांमधूनही निर्माण होते, याचे स्पष्टीकरण या गाथेत अप्रत्यक्ष राहते. (आंबेडकर १९५७, ११२; मुणगेकर २००८, १३४).

३. २. अप्पमादवग्ग

मूळपाली गाथा (२१)
"अप्पमादो अमतपदं, पमादो मच्चुनो पदं।
अप्पमत्ता न मीयन्ति, ये पमत्ता यथा मता"॥

मराठी भाषांतर;- अप्रमाद (उत्साह) हा अमृतत्वाचा मार्ग आहे, प्रमाद (आळस) हा मृत्यूचा मार्ग आहे. जे अप्रमादी असतात ते कधी मरत नाहीत. जे प्रमादी असतात ते जिवंत असूनही मेल्यासारखे असतात.

चिकित्सक विश्लेषण;- 'अप्पमाद' ही संकल्पना बुद्ध धम्माचा कणा आहे. हा विचार यांत्रिक, आळशी व अंधश्रद्धाळू जीवनाचा त्याग करून उत्साहि, उद्योगी व जागृत जीवन जगण्याचा आग्रह धरतो. अस्तित्ववादी तत्त्वज्ञानातील ('Authentic Living') शी याचा थेट संवाद आहे. तथापि, ही गाथा वैयक्तिक शिस्तीवर अती भर देते; जेव्हा एखादी संस्था किंवा राज्यव्यवस्था 'प्रमादी' (भ्रष्ट किंवा अकार्यक्षम) बनते, तेव्हा केवळ व्यक्तिगत अप्पमाद अपुरा ठरतो, ही तिची संस्थात्मक मर्यादा आहे. (काळसेकर १९६५, ७८).

३.३. चित्तवग्ग

मूळपाली गाथा(३३)
"फन्दनं चपलं चित्तं, दुरक्खं दुन्निवारयं।
उजुं करोति मेधावी, उमुकारो व तेजनं"॥

मराठी भाषांतर;- मन हे चंचल आहे, अस्थिर आणि नियंत्रित करायला कठीण आहे. परंतु बुद्धिमान व्यक्ती या मनाला तसे सरळ करतो, जसा तीरंदाज बाणाला सरळ करतो.

चिकित्सक विश्लेषण;- मानवी भावनांचे आणि चित्ताच्या अस्थिरतेचे हे वास्तववादी विश्लेषण आहे. विपश्यना ध्यानाचा आधार हीच गाथा आहे. आधुनिक मज्जाशास्त्र (Neuroscience) आणि 'Neuroplasticity' या सिद्धांतानुसार मानवी मन सरावाने बदलता येते, याचे हे प्राचीन निरीक्षण आहे. परंतु, मानवी मनाच्या अस्वस्थतेला कारणीभूत असणाऱ्या बाह्य सामाजिक, राजकीय आणि आर्थिक ताणतणावांचा विचार न करता केवळ आंतरिक सरावावर भर देणे ही एकांगी दृष्टी ठरू शकते (राहुल १९७४, ४५).

३.४. पुप्फवग्ग

मूळपाली गाथा (५४)
"न पुप्फगंधो पटिवातमेति, न चंदनं तगरमल्लिका वा।

सतञ्च गंधो पटिवातमेति, सब्बा दिसा सप्पुरिसो पवाति"॥

मराठी भाषांतर;- फुलांचा, चंदनाचा , तगराचा, किंवा जाईचा सुगंध वाऱ्याच्या विरुद्ध जात नाही. परंतु सज्जनांचा सुगंध वाऱ्याच्या विरुद्धही सर्व दिशांना पसरतो.

चिकित्सक विश्लेषण;- बाह्य रूप, सौंदर्य आणि कर्मकांडात्मक श्रेष्ठत्वापेक्षा 'चरित्र' श्रेष्ठ आहे, हे ही गाथा सांगते. जन्मजात सौंदर्य किंवा बाह्य आभूषणांऐवजी आचरणाच्या सुगंधाला महत्त्व देऊन बुद्धांनी शिलाला महत्व देउन या ठीकाणी नैतिक स्वायत्तता प्रस्थापित केली. समाजसुधारणेच्या दृष्टीने हे मानवी मूल्यांचे सार्वत्रिकीकरण आहे. (कौसल्यायन १९६२, ९२).

३.५. बालवग्ग

मूळपाली गाथा (६३)

"यो बालो मञ्ञति बाल्यं, पण्डितो वापि तेन सो।
बालो च पण्डितमानी, स वे बालो ति वुच्चति"॥

मराठी भाषांतर;- जर मूर्खाला स्वतःच्या अज्ञानाची जाणीव असेल, तर तो या कारणाने ज्ञानी ठरतो. परंतु जो मूर्ख असूनही स्वतःला पंडित समजतो, तोच खरा मूर्ख होय.

चिकित्सक विश्लेषण;- ही गाथा अज्ञानाच्या वृत्तिच्या मानसिक विचरावर तीव्र प्रहार करते. आधुनिक सामाजिक मानसशास्त्रातील (जिथे कमी ज्ञान असणारे लोक स्वतःला तज्ज्ञ समजतात) याचे हे प्राचीन प्रतिनिधिक रूप आहे. तथापि, अज्ञानाची व्याख्या करताना बौद्ध परंपरेने शैक्षणिक आणि सामाजिक शोषणातून लादलेल्या अज्ञानाचा विचार येथे स्पष्ट केलेला नाही, हा टीकात्मक मुद्दा ठरतो (मुणगेकर २००८, १३४).

३.६. पण्डितवग्ग

मूळपाली गाथा (७६)

"निधीनं व पवत्तारं, यं पस्से वज्जदस्सिनं।
निग्गय्हवादिं मेधाविं, तादिसं पण्डितं भजे।
तादिसं भजमानस्स सेय्यो होति न पापियो"॥

मराठी भाषांतर;- ज्या प्रमाने गुप्त धनाचासाठा दाखवनारा आहे. त्याप्रमाने आपल्या चुका दाखवनार्याला समजावे, जो आपल्या चुका आणि निंदा दाखवुन योग्य गोष्टींवर मार्गदर्शन करतो, अशा ज्ञानी माणसाला गुप्त खजिना दाखवणाऱ्या मार्गदर्शकाप्रमाणे मानून त्याचा संग करावा.

चिकित्सक विश्लेषण;- ही गाथा लोकशाहीवादी संवाद आणि 'विधायक टीकेचा' स्वीकार करण्याचा पायंडा पाडते. अहंकाराचा त्याग करून स्वतःमध्ये नम्रता, सुधारणा करण्याची ही वैज्ञानिक वृत्ती आहे. परंतु, सत्तासंबंधांमध्ये उच्च पदावरील व्यक्ती किंवा राज्यकर्ते सामान्य माणसाची टीका कशी स्वीकारतील, यासाठीच्या सामाजिक चौकटीचा ग्रंथात अभाव दिसतो (जोशी २०१०, ६७).

३.७. अरहन्तवग्ग

मूळ पाली गाथा (९०)

"गतद्धिनो विसोकस्स, विप्पमुत्तस्स सब्बधि।
सब्बगन्थप्पहीनस्स परिलाहो न विज्जति"॥

मराठी भाषांतर;- ज्याने आपला आध्यात्मिक प्रवास पूर्ण केला आहे, जो शोकरहित आहे, ज्याच्या सर्व गाठी (आसक्ती) सुटल्या आहेत, त्याला कोणताही मानसिक संताप होत नाही.

चिकित्सक विश्लेषण;- अर्हंत ही बौद्ध धर्मातिल सर्वोच्च स्थिती आहे. दुःखापासून मुक्ती आणि मानसिक समतोल (Equanimity) यांचे हे रूप आहे. परंतु, ही संकल्पना सामान्य गृहस्थासाठी अतिशय आत्यंतिक आणि अती आदर्शवादी वाटू शकते. त्यामुळे व्यावहारिक नीतिशास्त्राशी तिचा समन्वय साधणे आवश्यक ठरते (कोसंबी १९३३, ११८).

३.८. सहस्सवग्ग

मूळपाली गाथा (१०३)

"यो सहस्सं सहस्सेन, संगामे मानुसे जिने।
एकञ्च जेय्यमत्तानं, स वे संगामजुत्तमो"॥

मराठी भाषांतर;- जो युद्धात हजारो माणसांवर विजय मिळवतो, त्यापेक्षा ज्याने स्वतःवर विजय मिळवला आहे, तोच खरा विजयी होय.

चिकित्सक विश्लेषण;- सम्राट अशोकाच्या कलिंग युद्धानंतरच्या परिवर्तनाशी आणि बुद्धांच्या अहिंसावादाशी ही गाथा थेट जोडलेली आहे. सैनिकी किंवा लष्करी ताकदीपेक्षा आंतरिक आत्मसंयम आणि नैतिक विजय श्रेष्ठ मानणे, हा विचार आधुनिक शांतता अभ्यासाचा पाया आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या गाथेचा वापर हिंसेच्या विरोधात आत्मबलाचे समर्थन करण्यासाठी केला (आंबेडकर १९५७, १४५).

३.९. पापवग्ग

मूळपाली गाथा (११६)

"अभित्थरेथ कल्याणे, पापा चित्तं निवारये।
दन्धं हि करोतो पुञ्ञं, पापस्मिं रमती मनो"॥

मराठी भाषांतर;- कुशल कर्म करण्यात घाई करावी आणि मनाला पापापासून रोखावे. कारण पुण्य कर्म (चांगले काम) करण्यात हलगर्जि केल्यास मन वाईट गोष्टींमध्ये रमत जाते.

चिकित्सक विश्लेषण;- ही गाथा नैतिक कृतीतील 'तातडी' स्पष्ट करते. मानवी मनाची आळसाकडे आणि प्रलोभनांकडे झुकणारी प्रवृत्ती लक्षात घेऊन त्वरित कृतीचा आग्रह धरला आहे. परंतु, कायदेशीर व न्याय्य चौकटीशिवाय केवळ व्यक्तिगत कुशल कृती सामाजिक पाप किंवा गुन्हेगारी रोखू शकत नाही, ही तिची संस्थात्मक मर्यादा आहे (काळसेकर १९६५, १०२).

३.१०. दंडवग्ग

मूळपाली गाथा (१३०)

"सब्बे तसंति दंडस्स, सब्बेसं जीवितं पियं।
अत्तानं उपमं कत्वा, न हनेय्य न घातये"॥

मराठी भाषांतर;- सर्व प्राणी दंडाला (शिक्षेला) घाबरतात, सर्वांना आपले जीवन प्रिय आहे. स्वतःची तुलना इतरांशी करून कोणीही कोणाची हत्या करू नये किंवा हत्येस प्रवृत्त करू नये.

चिकित्सक विश्लेषण;- ही गाथा मानवी हक्कांची आणि प्राणिमात्रांवरील दयेची सर्वोत्कृष्ट सनद आहे. 'स्वतःच्या वेदनेवरून दुसऱ्याच्या वेदनेचा अंदाज लावणे' हा धम्मपदातिल अहिंसेचा नैतिक निकष आहे. हा विचार आधुनिक शांतता शिक्षण व पर्यावरण नीतिशास्त्राचा कणा आहे. परंतु, गुन्हेगारी रोखण्यासाठी शासनाने द्यावयाच्या कायदेशीर दंडाबाबत बुद्ध कातडी वाचवणारी भूमिका घेतात की योग्य दंडाचे समर्थन करतात, यावर येथे मौन आहे (कौसल्यायन १९६२, १३४).

३.११. जरावग्ग

मूळपाली गाथा (१४८)

"परिजिन्नमिदं रूपं, रोगनिड्डं पभंगुरं।
भिज्जति पूतिसन्देहो, मरणंतं हि जीवितं"॥

मराठी भाषांतर;- हे शरीर जिर्णरोगाचे घर झालेले, आणि अत्यंत ठिसूळ आहे. हा दुर्गंधीयुक्त देह शेवटी नष्ट होनार आहे, कारण जीवनाचा शेवट मृत्यूच आहे.

चिकित्सक विश्लेषण;- शरीराच्या अनित्यतेचे आणि नश्वरतेचे हे वास्तववादी, चित्रण आहे. मानवी अहंकार, सौंदर्य व उपभोगवाद यांवर ही गाथा औषधासारखा प्रहार करते. परंतु, या गाथेचा अति-नकारात्मक किंवा अती-वैराग्यवादी अर्थ काढल्यास तो जीवनाबद्दल उदासीनता (Nihilism) निर्माण करू शकतो, ही भीती कायम राहते. (राहुल १९७४, ८९).

३.१२. अत्तवग्ग

मूळपाली गाथा (१६०)

"अत्ता हि अत्तनो नाथो, को हि नाथो परो सिया।
अत्तना हि सुदन्तेन, नाथं लभति दुल्लभं"॥

मराठी भाषांतर;- मनुष्य स्वतःच स्वतःचा मालक आहे, दुसरा कोण रक्षक असणार? स्वतःवर पूर्ण नियंत्रण मिळवल्याने माणसाला तो आश्रय मिळतो, जो अत्यंत दुर्मिळ आहे.

चिकित्सक विश्लेषण;- बौद्ध धर्म हा ईश्वराचे, दैवाचे किंवा मध्यस्थांचे परोहितशाहीचे वर्चस्व नाकारणारा धर्म आहे, याचे हे सर्वोच्च प्रमाण आहे. डॉ. आंबेडकरांच्या "अत्त दीप भव" (स्वतःचे दीप स्वतः व्हा) आणि दलित, शोषितांच्या स्वाभिमान

आंदोलनाचा हा मुख्य वैचारिक स्रोत ठरला. तथापि, घोर सामाजिक, आर्थिक विषमता असलेल्या समाजात केवळ स्वतःच्या बळावर उभे राहणे शोषितांसाठी किती कठीण असते, या सामाजिक अडसर कडे ही गाथा लक्ष वेधत नाही (आंबेडकर १९३६, २२).

३.१३. लोकवग्ग

मूळ पाली गाथा (१६८)

"उतिठ्ठे नप्पमज्जेय्य, धम्मं सुचरितं चरे।
धम्मचारी सुखं सेति, अस्मिं लोके परम्हि च"॥

मराठी भाषांतर;- आळस सोडून उठून उभे राहा, सुचरित धर्माचे (सदाचाराचे) पालन करा. धर्माचे आचरण करणारा माणूस इथे आणि परलोकात (सर्वत्र) सुखाने राहतो.

चिकित्सक विश्लेषण;- ही गाथा निष्क्रियतेचा (Passivity) त्याग करून सुचरिताचा मार्ग स्वीकारण्याचा संदेश देते. 'लोक' म्हणजे भौतिक जगात जगताना नैतिक मूल्ये कशी जपावीत, याचे हे मार्गदर्शन आहे. यात 'परलोक' हा शब्द मानसिक अवस्थांच्या संदर्भात वाचणे आधुनिक तर्कशास्त्राला धरून आहे. (मुणगेकर २००८, १५६).

३.१४. बुद्धवग्ग

मूळपाली गाथा (१८३)

"सब्बपापस्स अकरणं, कुसलस्स उपसंपदा।
सचित्तपरियोदपनं, एतं बुद्धान सासनं"॥

मराठी भाषांतर;- कोणत्याही प्रकारचे पाप न करणे, कुशल (कल्याणकारी) कर्मांचा संचय करणे आणि स्वतःचे मन पूर्णपणे शुद्ध करणे, हेच बुद्धांचे शासन (शिकवण) आहे.

चिकित्सक विश्लेषण;- ही गाथा बौद्ध धम्माचा संक्षिप्त ज्ञानकोश मानली जाते. येथे बुद्ध म्हणजे केवळ 'सिद्धार्थ गौतम' ही व्यक्ती नसून 'जागृत अवस्था' आहे. व्यक्तीपूजेपेक्षा धम्माच्या (तत्त्वज्ञानाच्या) आचरणाला दिलेले हे प्राधान्य बौद्ध धर्माचे लोकशाहीकरण स्पष्ट करते. ऐतिहासिक बुद्ध आणि पौराणिक बुद्ध यातील फरक स्पष्ट करण्यासाठी ही गाथा महत्त्वाची आहे (कोसंबी १९३३, १३२).

३.१५. सुखवग्ग

मूळ पाली गाथा (२०४)

"आरोग्यपरमा लाभा, संतुट्ठी परमं धनं।
विस्सासपरमा ञाती, निब्बानं परमं सुखं"॥

मराठी भाषांतर;- आरोग्य हा सर्वात मोठा लाभ आहे, समाधान (संतोश) हे सर्वात मोठे धन आहे, विश्वास हा सर्वात मोठा नातेवाईक आहे, आणि निर्वाण हे सर्वात मोठे सुख आहे.

चिकित्सक विश्लेषण;- भांडवलशाही उपभोगवाद आणि भौतिक संपत्तीच्या मागे धावणाऱ्या आधुनिक मानवी समाजाला ही गाथा सुखाची नवी व्याख्या देते. मानसिक शांतता आणि आंतरिक समाधान यालाच खरे सुख मानले आहे. आधुनिक वैद्यकशास्त्र व मनोचिकित्सेत आरोग्याच्या व्याख्येत मानसिक सुखाचा जो समावेश केला जातो, त्याचा पाया यात आढळतो (जोशी २०१०, ७८).

४. विषयनिहाय समग्र समन्वय व टीकात्मक मूल्यमापन

४.१ नैतिक स्वायत्तता

धम्मपद कोणत्याही दैवी दंडाची, ईश्वराच्या अवताराची किंवा परलोकातील काल्पनिक न्यायाची भीती दाखवत नाही. 'मनोपुब्बंगमा धम्मा' आणि 'अत्ता हि अत्तनो नाथो' या गाथा स्पष्ट करतात की, नैतिकतेचे संपूर्ण अधिष्ठान माणसाची स्वतःची जाणीव आणि आचरण आहे. ही मानवी स्वायत्तता वैदिक युगातील यज्ञ-याग आणि देवतांच्या दास्यातून मानवी बुद्धीला मुक्त करते.

४.२. सामाजिक समता व वर्णव्यवस्थेचे निर्मूलन:-

"ब्राह्मणवग्ग" हा केवळ धार्मिक उपदेश नसून, तो जन्मजात उच्च नीचतेला दिलेला ऐतिहासिक धक्का आहे. 'ब्राह्मण' या तत्कालीन सर्वोच्च सामाजिक व्यवस्थेचा ताबा घेऊन तिचे नैतिक पुनर्व्याख्यान करणे, ही बुद्धांची एक महत्त्वाची भाषिक

व सामाजिक क्रांती होती. हिंसेचा त्याग, सहानुभूती, आणि सर्व प्राण्यांच्या जिवाबद्दलचा आदर हा आधुनिक शांतता अभ्यासाला पायाभूत पुरवठा करतो.

४.३. ग्रंथाच्या ऐतिहासिक व संरचनात्मक मर्यादा

चिकित्सक अभ्यासक म्हणून धम्मपदाच्या मर्यादांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

१. वैयक्तिक नैतिकतेचा अति-आग्रह;- धम्मपद मुख्यत्वे वैयक्तिक आचरण शुद्धीवर भर देते. परंतु, गरिबी, शोषण, राजकीय हुकूमशाही किंवा जातीयवाद यांसारखे प्रश्न केवळ वैयक्तिक नैतिकतेने सुटू शकत नाहीत; त्यासाठी सामाजिक, राजकीय संरचना बदलावी लागते, ज्याचे स्पष्ट धोरण धम्मपदात अप्रत्यक्ष आहे.

२. वैराग्याचा संभाव्य धोका;- अनित्यता आणि तृष्णा-नाशाच्या आत्यंधिक आग्रहामुळे सामान्य नागरिकांमध्ये संसाराबद्दल आणि सामाजिक सहभागाबद्दल उदासीनता (Nihilism) निर्माण होण्याचा धोका असतो.

५. समकालीन प्रासंगिकता (Contemporary Relevance)

मानसिक आरोग्य व मनोचिकित्सा

चित्तवग्ग आणि अप्पमादवग्ग मधील लक्ष-नियंत्रण आणि भावना-व्यवस्थापनाचे विचार CBT (Cognitive Behavioral Therapy) व MBSR (Mindfulness-Based Stress Reduction) या प्रणालींमध्ये प्रत्यक्ष वापरले जात आहेत.

सामाजिक न्याय व मानवाधिकार

ब्राह्मणवग्ग मधील जन्मजात श्रेष्ठत्वाची टीका संयुक्त राष्ट्रांच्या (UN) मानवाधिकार जाहीरनाम्याशी आणि भारतातील जातिनिर्मूलन चळवळींशी थेट संवाद साधते.

शाश्वत विकास व पर्यावरण नीतिशास्त्र;-

तण्हावग्ग मधील अमर्याद उपभोगवादाची टीका आधुनिक हवामान बदल आणि अनियंत्रित भांडवलशाहीच्या संकटावर सर्वोत्तम पर्याय म्हणून मांडता येते.

शांतता आणि संघर्ष निवारण;-

कोधवग्ग आणि दंडवग्ग मधील अक्रोधाने क्रोधावर विजय मिळवणे हे सूत्र आंतरराष्ट्रीय राजकारणात आणि सामाजिक संघर्षात हिंसेला पर्याय म्हणून प्रासंगिक आहे.

६. निष्कर्ष

धम्मपदातील सर्व १५ वग्गांतील निवडक गाथांचे चिकित्सक अध्ययन असे सिद्ध करते की, हा ग्रंथ कोणत्याही एका संप्रदायाची किंवा धर्माची पोथी नसून, तो समस्त मानवी वर्तन, चेतना आणि समाजव्यवस्थेचे तर्कनिष्ठ आणि इहवादी (Secular) विश्लेषण करणारा ज्ञानचा भंडार आहे. यमकवग्ग मधील मनाच्या प्राधान्यापासून सुरू झालेला हा तात्त्विक प्रवास ब्राह्मणवग्ग मधील वर्णव्यवस्थेच्या विसर्जनावर संपतो.

चिकित्सक अभ्यासातून ग्रंथाच्या संस्थात्मक मर्यादा उघड होत असल्या, तरी त्या मर्यादा ग्रंथाचे ऐतिहासिक स्वरूप स्पष्ट करतात, त्याचे मूल्य कमी करत नाहीत. धम्मपदाचे समकालीन वाचन हे भक्तिभावाने न होता, तर्कनिष्ठ, मानवतावादी आणि सामाजिक न्यायाच्या चौकटीत केले पाहिजे. भारतीय विद्वत्परंपरेतील टीकात्मक दृष्टिकोन आणि आधुनिक समाजविज्ञानाचा समन्वय साधल्यास, धम्मपद हे भविष्यातील शांततापूर्ण, समतावादी आणि विवेकवादी समाज निर्मितीसाठी एक अजरामर दीपस्तंभ ठरते.

संदर्भ सूची :

१) आंबेडकर, बी. आर. बुद्ध आणि त्यांचा धम्म. अनुवादक डॉ. पी. टी. बोराळे, सिद्धार्थ प्रकाशन, १९५७.
२) ॲनिहिलेशन ऑफ कास्ट, एन ॲनोटेटेड क्रिटिकल एडिशन. संपादक;- एस. आनंद, नवयान प्रकाशन, २०१४.
३) काळसेकर, वा. रा. धम्मपद. एक चिकित्सक व तात्त्विक अभ्यास. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, १९६५.
४) कौसल्यायन, भदंत आनंद. धम्मपद. पाली मूळ, मराठी भाषांतर व भाष्य. बौद्ध साहित्य परिषद, १९६२.
५) कोसंबी, धर्मानंद. बुद्धाचे चरित्र व धम्म. एक समीक्षात्मक अध्ययन. लोकवाङ्मय गृह, १९३३.

६) कुलकर्णी, श्री. य. धम्मपद. गाथा, अर्थ व टीपा. सुगावा प्रकाशन, २०१२.
७) जोशी, के. एन. बौद्ध नीतिशास्त्र आणि आधुनिक भारतीय समाज. नवयान प्रकाशन, २०१०.
८) मुणगेकर, भालचंद्र. भारतीय तत्त्वज्ञान, बुद्ध आणि सामाजिक क्रांती. राजहंस प्रकाशन, २००८.
९) राहुल, सांकृत्यायन. बौद्ध धर्माचा इतिहास, तत्त्वज्ञान आणि धम्मपद विश्लेषण. राजकमल प्रकाशन, १९७४.
१०) विपश्यना संशोधन संस्था. धम्मपद (पाली पाठासह मराठी अनुवाद). विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट (VRI), १९९५.